# विद्यार्थी विकास विभाग

## वार्षिक अहवाल ०१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७

* प्रत्येक वर्षी विद्यार्थी कल्याण विभागामार्फत शासन परिपत्रकाप्रमाणे विविध महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच शासनाच्या वेळोवळी प्राप्त आदेशानुसार विविध उपक्रम राबविले जातात.

* दि. १५ ऑगस्ट, २०१७ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* बहि:शाल शिक्षण केंद्राचे वार्षिक नियोजन करण्यासंदर्भात कार्यवाह व अध्यक्ष/सचिव व बहि:शाल शिक्षण केंद्र वक्ता यांचे संयुक्त कृतिसत्र (कार्यशाळा) दि. ३१/०८/२०१६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या कृतिसत्रासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. तेज निवळीकर, पुणे व डॉ. कैलास बवले, पुणे हे उपस्थित होते.

* दि. १७ सप्टेंबर, २०१७ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित विद्यापीठ ध्वजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत विद्यापीठगीत व राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* दरवर्षी १७ सप्टेंबर (विद्यापीठ वर्धापन दिन) रोजी उत्कृष्ट वार्षिक अंकास तसेच राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना गौरविण्यात येते. २०१६ मध्ये मातोश्री प्रतिष्ठान ग्रुप ऑफ इंस्टिट्युट, जिजाऊनगर, खुपसरवाडी, जि. नांदेडच्या 'सृष्टी' या वार्षिक अंकास प्रथम, एस. जी. जी. एस. इंजिनिअरींग कॉलेज, विष्णुपुरी, जि. नांदेडच्या 'दृष्टी' तसेच कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य

महाविद्यालय, मानवत जि. परभणीच्या 'मानवता' या अकांना विभागून द्वितीय व हु. बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर, जि. हिंगोलीच्या 'हुतात्मा बहिर्जी वार्षिक' व नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणीच्या 'प्रेरणा' या अकांस तृतीय विभागून पारीतोषिक प्राप्त झाले आहे. श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूरच्या 'विवेक जागर' व ज्ञानोपासक महाविद्यालय, जि. परभणीच्या 'ज्ञानोपासक' या अंकांना उत्तेजनार्थ पारीतोषिक देण्यात आले. राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये विविध कलाप्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. उपरोक्त पारिताषिकांचे वितरण आदरणीय संत बाबा बलविंदरसिंगजी, गुरूद्वारा लंगरसाहिब बोर्ड, नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले.

* स्वा.रा.ती.म.विद्यापीठचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव मातोश्री प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय, खुपसरवाडी, विष्णुपुरी, नांदेड येथे दि. २९/०९/२०१६ ते ०२/१०/२०१६ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. युवक महोत्सवाचे उद्‌घाटन दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास मा. खा. युवराज छत्रपती संभाजीराजे (राज्यसभा सदस्य), मा. आ. हेमंतभाऊ पाटील तसेच विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. पंडित विद्यासागर, प्र. कुलगुरू मा. डॉ. गणेशचंद्र शिंदे उपस्थित होते. तसेच बक्षिस वितरण व समारोप कार्यक्रम दि. ०२ ऑक्टोबर २०१६ रोजी झाला. बक्षिस वितरण कार्यक्रमास मा. खा. डॉ. अशोकराव चव्हाण, मा. आ. डी. पी. सावंत, प्रसिध्द अभिनेते डॉ. अमोल कोल्हे, मा. प्रफुल तावरे (उद्योजक) तसेच विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. पंडित विद्यासागर, स्वागताध्यक्ष मा. कामाजी पवार उपस्थित होते.

* शैक्षणिक वर्ष २०१६–१७ चा १४ वा महाराष्ट्र राज्य 'इंद्रधनुष्य' राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दि. ०५ ते ०९ नोव्हेंबर २०१६ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे संपन्न झाला. सदरील युवक महोत्सवात स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. या युवक महोत्सवात महाराष्ट्रातील २० विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. या राज्यस्तरीय युवक महोत्सवात विद्यापीठास एकूण चार पारितोषिके प्राप्त झाली. त्यामध्ये वक्तृत्व या कला प्रकारात किरण देशमुख या विद्यार्थ्याने प्रथम पारितोषिक प्राप्त केले. प्रहसन (स्कीट) या कलाप्रकारात विद्यापीठास द्वितीय

पारितोषिक प्राप्त झाले आहे. या कलाप्रकारात विजय मस्के, वर्धन चौधरी, निनाद देशपांडे, सुमेध महाजन, गंगाधर वाडीकर, या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. तालवाद्य या कलाप्रकारात तेजेस धुमाळ या विद्यार्थ्याने तृतीय पारितोषिक प्राप्त केले. तर सुगम गायन भारतीय या कलाप्रकारात शबरी हिरवे, या विद्यार्थीनीस तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. विद्यापीठाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या सर्व कलाप्रकाराचे उत्कृष्ट सादरीकरण झाले.

* पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव गणपत विद्यापीठ, मेहसाना, गुजरात दि. ०६ ते १० जानेवारी, २०१७ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. सदरील महोत्सवात स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. या युवक महोत्सवात नक्कल (मिमीक्री) स्पर्धेमध्ये राठोड प्रविण एकनाथ या विद्यार्थ्याने भारतातील नोटाबंदी व कॅशलेश व्यवहार या विषयावर सुंदर अशी मांडणी करून विविध पक्षी, अभिनेते व राजकीय नेते मंडळींचा हुबेहूब आवाज काढून प्रेक्षकांची मने जिंकली व सदर विद्यार्थ्याने प्रथम पारितोषिक प्राप्त केले. शास्त्रीय तालवाद्य कलाप्रकारात धुमाळ तेजस विश्वनाथ या विद्यार्थ्याने द्वितीय पारितोषिक प्राप्त केले आहे व यास जाधव अभिजीत या विद्यार्थ्याने हार्मोनिअमद्वारे साथ दिली. ऑन द स्पॉट पेंटींग या कलाप्रकारात चपेले सुरेश या विद्यार्थ्याने द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. तर शास्त्रीय स्वरवाद्य कलाप्रकारात कान्हेकर सौरभ या विद्यार्थ्याने तृतीय पारितोषिक प्राप्त केले. या कलाप्रकारासाठी सोमवंशी विशाल या विद्यार्थ्याने तबल्याद्वारे साथ दिली. चारही कलाप्रकारातील विद्यार्थी कोल्हापूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र ठरले.

* विद्यार्थी विकास विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात नव्यानेच ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष सुरू करण्यात आला आहे. कक्षाच्या उद्घाटन समारंभाचा कार्यक्रम दि. १२/०६/२०१७ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तेज निवळीकर, पुणे हे उपस्थित होते. मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरूंच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

* शैक्षणिक वर्ष २०१६—१७ चा 'आविष्कार—२०१६' राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ विज्ञान संशोधन महोत्सव दि. २७ ते २९ जानेवारी, २०१७ दरम्यान प्रस्तुत विद्यापीठात आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमात राष्ट्रगीत व विद्यापीठगीत सादर करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमात दि. २८ जानेवारी, २०१७ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध कलाप्रकाराचे उत्तम सादरीकरण विद्यार्थी कलावंतांनी करून कार्यक्रम यशस्वी केला.

* शिक्षा मंडळ, वर्धा येथे "हमारा राष्ट्र कैसा है और वह हो सकता है कैसा?" या विषयावर दि. २२ व २३ जानेवारी २०१७ रोजी ४३ व्या कमलनयन बजाज मेमोरियल राष्ट्रीय आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा २०१७ आयोजित करण्यात आली होती. सदरील स्पर्धा वर्ष १९७५ पासून शिक्षा मंडळ, वर्धाकडून आयोजित केली जाते. उपरोक्त स्पर्धेसाठी स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून किरण प्रकाशराव देशमुख यास पाठविण्यात आले होते. या स्पर्धेत किरण देशमुख या विद्यार्थ्याने दिलेल्या विषयावर मुद्देसूद मांडणी करून उत्कृष्ट सादरीकरण केले. अत्यंत मानाच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत भारतातील विविध विद्यापीठातून सहभाग नोंदविलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांमधून किरण प्रकाशराव देशमुख याने सर्वप्रथम पारितोषिक प्राप्त केले.

* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या २०१७ मधील आयोजित पदवीदान समारंभात विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठ गीत व राष्ट्रगीताचे सादरीकरण करण्यात आले.

* दि. १० ते १४ फेब्रुवारी, २०१७ दरम्यान 'शिवोत्सव—२०१७' अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या युवक महोत्सवात स्वा.रा.ती.म. विद्यापीठास तीन पारितोषिक प्राप्त झाली. शास्त्रीय तालवाद्य या कलाप्रकारात तेजेश धुमाळ या विद्यार्थ्यास द्वितीय, शास्त्रीय स्वरवाद्यामध्ये सौरभ कान्हेकर या विद्यार्थ्यास तृतीय तर ऑन द स्पॉट पेंटींग (चित्रकला) या कलाप्रकारात चपेले सुरेश या विद्यार्थ्यास चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. शास्त्रीय तालवाद्य या कलाप्रकारास जाधव अभिजीत या विद्यार्थ्याने हर्मोनिअमद्वारे साथ दिली व शास्त्रीय स्वरवाद्यसाठी सोमवंशी विशाल या विद्यार्थ्याने तबल्याद्वारे साथ दिली.

* शैक्षणिक वर्ष २०१६—१७ चा १० वा दक्षिण आशियाई आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव दि. २८ फेब्रुवारी ते ०४ मार्च, २०१७ दरम्यान देवी अहिल्या विश्वविद्यालय, इंदोर, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आला होता. या युवक महोत्सवात प्रस्तुत विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच विद्यापीठाला दक्षिण आशियाई आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात सहभागी होण्याचा मान मिळाला. किरण देशमुख या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांने वक्तृत्व या स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने भारताचे नेतृत्व करून उत्तम मांडणी केली.

* विद्यार्थी विकास विभागांतर्गत शै. वर्ष २०१६—१७ चा विद्यापीठ परिसराचे ज्ञानतीर्थ—२०१७ वार्षिक स्नेहसंमेलन दि. ०६ ते ०८ मार्च, २०१७ या कालावधीत संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ललित अधाने तर समारोप व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. विष्णु सुरवसे हे उपस्थित होते.

* दि. २६ जानेवारी, २०१७ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* दि. ०१ मे, २०१७ रोजी महाराष्ट्रदिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी विकास विभाग.

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**Department of Students' Development**

Annual Report 1st July 2016 to 30th June 2017

---

As per the government notifications the Department of Students' Development organizes programs on various great leaders' birth and death anniversaries. Different activities are also being run according to government directions.

On the auspicious occasion of Independence Day on 15th August 2017, national anthem was sung in flag hoisting program organized at university campus by the Department of Students' Development.

In reference to do annual planning of Extramural Studies Centre's working president/secretary and Extramural Studies Centre's speakers jointly organised a workshop on 31st August, 2016. Hon'ble Dr. Tej Nivlikar and Dr. Kailash N. Bawale (both from Pune) put forward their valuable inputs and guidance for this program.

On the occasion of University's Foundation Day on 17th September 2017, National anthem was sung in flag hoisting program organized at university campus by the Department of Students' Development.

Every year on 17th September (University Foundation Day) the best annual magazine and prize winning students at State, West Zonal and National Level Youth Festival are being felicitated. In 2016 Matoshri Pratishthan Group of Institute, Jijau Nagar Khupsarvadi Dist Nanded's annual magazine 'Shrushti' was awarded by first prize, SGGS Engineering college Vishnupuri Dist. Nanded's annual magazine 'Drushti' and Katruwar Arts, Ratanlal Kabra Science and B. R. Mantri Commerce College, Manvat Dist Parbhani's 'Manavata' magazines were jointly awarded the second prize and Hutatma Bahirjee Smarak Mahavidyalaya Vasantnagar Dist Hingoli's 'Hutatma Bahirjee Varshik' and Nutan Mahavidyalaya Selu Dist Parbhani's 'Prerna' were jointly awarded the third prize. Shri Havagi Swami Mahavidyalaya Udgir Dist Latur's 'Vivek Jagar' and Dnyanopasak Mahavidyalaya Dist Parbhani's 'Dnyanopasak' were awarded by consolidated prizes. The list of first, second and third prize winning students in various categories at State,West zonal and National level Youth festivals has been enclosed. The said prizes were distributed by the auspicious hands of Saint Baba Balvindarsinghji, Gurudwara Langar Sahib Board, Kautha, Nanded.

S.R.T.M. University's intercollegiate youth festival was organized from September 29th to October 2nd 2016 at Matoshri Pratishthan's Engineering College Khupsarvadi Nanded. Youth Festival was innaugrated by the auspicious hands of honourable Sindutai Sapkal, a renowned social worker. Honourable MP Chatrapati Shambhu Raje, MLA Hemant Patil and Vice-Chancellor of SRTMU Nanded Honble Dr. Pandit Vidyasagar were present for the function. Prize distribution and valedictory function was organised on October 2nd 2016. Hon'ble Ex. Cheif Minister of Maharashtra and MP Ashokraoji Chavan Saheb, MLA D.P. Sawant, Renowned

Actor Dr. Amol Kolhe, Renowned Businessman Hon'ble Praful Tawre and Hon'ble VC Dr. Pandit Vidyasagar sir were present for the ceremony.

Academic Year's 2016-17 14th Indradhanushya inter-university youth festival was organized from 5 th to 9th November. 2016 at Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. Team of SRTM University Nanded was participated in this festival. Among all over Maharashtra twenty Universities were participated in this festival. S.R.T.M.U.Nanded's team won four prizes in this festival. Among this four prizes first prize won by Deshmukh Kiran in Elocution and Second Prize won by Gangadhar Wadikar, Vijay Maske, Vardhan Choudhary, Ninad Deshpande and Sumedh Mahajan in Skit. Tejesh Dhumal won third prize in Classical Instrumental Solo Percussion. Shabree Hirve won third prize in Light Vocal Indian. All events perfectly performed by SRTMU Nanded's Students.

West Zonal Inter University Youth Festival was organized between 6th to 10 th Jan. 2017 at Ganpat University, Mehsana, Gujrat. S.R.T.M.U. Nanded's team participated in it. Rathod Pravin won first prize in Mimicry. The themes of his mimicry were demonization and cashless economy. In his presentation he imitated famous politicians and film actors voice very clearly. His overall performance was excellent.Tejesh Dhumal won second prize in Classical Instrumental Solo Percussion. In this event Jadhav Abhijeet was an accompanist on Harmonium. Chapele Suresh stood second in on the spot painting competition; Kanhekar Saurabh won the third prize in classical instrumental solo Non-Percussion. Vishal Somwanshi accompanied in classical instrumental solo Non-Percussion. Above mentioned participants had qualified for the National Youth Festival.

First of its type a "Senior Citizen Help Centre" was inaugurated by the Department of Students' Development. This centre's opening ceremony was held on 12th June, 2017. Hon'ble Tej Nivalikar (Pune) and Hon'ble Annasaheb Tekale ( Vice-president Fescom) were the chief guests of the program.

Academic Year's 2016-17 State Level Inter University "Avishkar-2016" Research Festival of Science was successfully held from 27th to 29th January. In this program national anthem and university song were sung by the students of respective Department. On 28th January, the Department of Students' Development successfully organised Cultural Program. In this cultural programme different events were performed by the students.

43rd Kamal Nayan Bajaj Memorial Inter University National Elocution competition, organised by Education Board Wardha, dated 22nd and 23rd January 2017. The subject of this competition was "Our Nation How It Is Today And How It Is Ought To Be." Since 1975 this competition is being organised by Education board Wardha. In this highly reputed competition, among the all India participants, Kiran Prakashrao Deshmukh, SRTMU Nanded's representative with his exceptional performance secured the first prize.

In the convocation function of the University, which was held on February 26th 2017 the national anthem and university song were sung by the students of respective Department.

All India Inter University "Shivostav-2017" National Youth Festival was organized between 10th to 14th February, 2017 at Shivaji University, Kolhapur. S.R.T.M.U. Nanded's team won three prizes in this festival. Tejesh Dhumal stood second in classical instrumental solo Percussion; Kanhekar Saurabh won third prize in classical instrumental solo Non-Percussion while Chapele Suresh won fourth prize in on the spot painting. In Classical Instrumental Solo Percussion Jadhav Abhijeet was an accompanist on Harmonium while Vishal Somwanshi accompanied in classical instrumental solo Non-Percussion.

Academic Year's 2016-17 10th International Youth Festival was successfully held at Devi Ahilya University, Indore, Madhya Pradesh during February 28th to March 4th 2017. The team of SRTMU Nanded too participated in this festival. In this festival Kiran Deshmukh was the representative of India.

During 6th to 8th March, 2017 the Department of Students' Development organised Annual Gathering "Dnyanteerth-2017". In the Opening Ceremony Dr. Lalit Udhane was the chief guest while in Valedictory and Prize Distribution Ceremony the chief guest was Dr. Vishnu Surwashe.

On the occasion of Republic Day on 26th Jan. 2017 flag hoisting ceremony was organized in university campus and National Anthem was sung by the Department of Students' Development.

On 1st May 2017, which is also celebrated as Maharashtra Din, the flag hoisting ceremony was organized as well as the national anthem was also sung by the Department of Students' Development.

**Dr. Rajeshwar Duduknale**

Director,
Student Welfare Department